**मोजणी फी दर व संवर्ग सुधारणा आणि सुलभीकरण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन परिपत्रक, क्र.संकीर्ण-२०२६/ई-१६०६१४३ /भूमापन**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २२ जून, २०२६

**संदर्भ** :- (१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.११.१०.२०२४ रोजीचे आदेश.
(२) महसूल व वन विभाग, शासन पत्र, क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३९१/ल-१, दि.२२.५.२०२५.
(३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक भूमापन-२/१८५१७२२/पोटहिस्सा मोजणी फी/२०२६, दिनांक १९/०३/२०२६.
(४) महसूल व वन विभाग, शासन पत्र, क्र. ई-१६०६१४३ /भूमापन, दि.२५.३.२०२६.

**प्रस्तावना :-**

मोजणी फी दर व संवर्ग सुधारणा आणि सुलभीकरण करणेबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.११.१०.२०२४ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानंतर महसूल व वन विभाग, शासन पत्र दि.२२.५.२०२५ अन्वये एकत्र कुटुंबाच्या धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्राचे आधारे विभाजन व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ अन्वये विभाजन / पोटहिस्सासाठी मोजणी फी रू. २००/- प्रति पोटहिस्सा निश्चित करण्यास मान्यता दिली आहे. जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १९/०३/२०२६ अन्वये संमतीने पोटहिस्सा, नोंदणीकृत वाटप व दिवाणी आदेशान्वये वाटप नुसार पोटहिस्सा मोजणी फी रूपये २००/- प्रति पोटिहिस्सा निश्चित केली आहे. तसेच महसूल व वन विभाग, शासन पत्र, दि.२५.३.२०२६ अन्वये शासकीय जमिनी/ मालमत्ताच्या मोजणीसाठी आणि महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत/ विविध प्राधिकरणे/ महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनी /मालमत्तांच्या मोजणीसाठी शुल्क निश्चित केले आहे.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या निर्णयांनुसार जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.११.१०.२०२४ च्या आदेशात सुधारणा करुन मोजणी फी दर व संवर्ग सुधारणा बाबतच्या एकत्रितरित्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील आदेश दि.११.१०.२०२४ अन्वये लागू असलेल्या मोजणी फी दर, मोजणी संवर्ग व कालावधी यामध्ये सुधारणा करून खालीलप्रमाणे मोजणी फी निश्चित करण्यात येत आहे.:-

**(१) महानगरपालिका / नगरपालिका हद्दी बाहेरील क्षेत्राचे जमीन मोजणीसाठी:-**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मोजणीचा प्रकार</th><th>नियमित</th><th>द्रुतगती</th></tr>
<tr><td>१.</td><td>एक किंवा समान धारक किंवा धारकांचे एक सर्व्हे नंबर / गट नंबर / कायम पोट हिस्सा/नगर भूमापन क्रमांक/ फायनल प्लॉट क्रमांक/ मंजूर रेखांकनातील एका भूखंडासाठी दोन हेक्टर मर्यादेपर्यत [हद्दकायम (कोर्ट कमिशन, सामिलीकरण)]</td><td>रू.२,०००/-</td><td>रू.८,०००/-</td></tr>
<tr><td>२.</td><td>त्याच एक सर्व्हे नंबर/गट नंबर/ कायम पोट हिस्सा/नगर भूमापन क्रमांक/ फायनल प्लॉट क्रमांक / मंजूर रेखांकनातील वर अ.क्र.१(१) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरीत प्रत्येक दोन हेक्टर क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास [हद्दकायम (कोर्ट कमिशन, सामिलीकरण)]</td><td>रू.१,०००/-</td><td>रू.४,०००/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>कोर्ट वाटप / पोटहिस्सा मोजणी/ एकत्र कुटुंब धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणी पत्र आधारे विभाजन मोजणी / महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये विभाजन मोजणी / संमतीने पोटहिस्सा मोजणी / नोंदणीकृत वाटप पत्रान्वये पोटहिस्सा मोजणी. (गट नंबर / सर्व्हे नंबर मधील सर्व पोटहिश्यांची मोजणी एकाच वेळी करणे आवश्यक राहील.)</td><td colspan="2">प्रत्येक पोटहिश्याकरीता मोजणी फी र.रू. २००/- उदा. एकूण ५ पोट हिस्से = १,०००/- रूपये</td></tr>
<tr><td>४.</td><td>महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपंचायत/ विविध प्राधिकरणे / महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनी / मालमत्तांची मोजणी</td><td colspan="2">१(१) व १(२) मध्ये नमूद केलेल्या नियमित दराच्या ५०% मोजणी फी आकारणेत यावी.</td></tr>
<tr><td>५.</td><td>शासकीय जमिनी व मालमत्तांची मोजणी</td><td colspan="2">१(१) व १(२) मध्ये नमूद केलेल्या नियमित दराच्या २५% मोजणी फी आकारणेत यावी.</td></tr>
</table>

**टीप :-** त्याच धारकांचे लगत जमिनीचे एक सर्व्हे नंबर / गट नंबर / कायम पोट हिस्सा/नगर भूमापन क्रमांक /फायनल प्लॉट क्रमांक / मंजूर रेखांकनातील एका भूखंडासाठी वरील १(१) व १(२) मध्ये नमुद केल्या प्रमाणे मोजणी फी आकारणी करावी.

**(२) महानगरपालिका/नगर पालिका / नगर पंचायत हद्दीमधील असलेल्या क्षेत्राचे जमीन मोजणीसाठी /कंपन्या / इतर संस्था व भूसंपादन संयुक्त मोजणीसाठी:-**

| अ.क्र. | मोजणीचा प्रकार | नियमित | द्रुतगती |
|---|---|---|---|
| १. | एक किंवा समान धारकांचे एक सर्व्हे नंबर गट / नंबर /कायम पोट हिस्सा/नगर भूमापन क्रमांक/ फायनल प्लॉट क्रमांक / मंजूर रेखांकनातील प्रत्येक भूखंडासाठी एक हेक्टरचे मर्यादेपर्यंत [हद्दकायम (कोर्ट कमिशन, सामिलीकरण)] | रु.३,०००/- | रू.१२,०००/- |
| २. | त्याच एक सर्व्हे नंबर गट / नंबर /कायम पोट हिस्सा/नगर भूमापन क्रमांक / फायनल प्लॉट क्रमांक/ मंजूर रेखांकनातील वर अ.क्र.२(१) मध्ये नमुद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरीत प्रत्येक एक हेक्टर क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास [हद्दकायम (कोर्ट कमिशन, सामिलीकरण)] | रु.१,५००/- | रु.६,०००/- |
| ३. | कोर्ट वाटप / पोट हिस्सा मोजणी / एकत्र कुटुंब धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणी पत्र आधारे विभाजन मोजणी / महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये विभाजन मोजणी / संमतीने पोटहिस्सा मोजणी / नोंदणीकृत वाटप पत्रान्वये पोटहिस्सा मोजणी. (गट नंबर / सर्व्हे नंबर मधील सर्व पोटहिश्यांची मोजणी एकाच वेळी करणे आवश्यक राहील.) | प्रत्येक पोटहिश्याकरीता मोजणी फी र.रु.१,०००/- उदा. एकूण ५ पोट हिस्से = ५,०००/-रूपये | प्रत्येक पोटहिश्याकरीता मोजणी फी र.रु.४,०००/- उदा. एकूण ५ पोट हिस्से = २०,०००/- रूपये |
| ४. | महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत / विविध प्राधिकरणे /महामंडळे यांच्या मालकीच्या जमिनी / मालमत्तांची मोजणी | २(१) व २(२) मध्ये नमूद केलेल्या नियमित दराच्या ५०% मोजणी फी आकारणेत यावी. | |
| ५. | शासकीय जमिनी व मालमत्तांची मोजणी | २(१) व २(२) मध्ये नमूद केलेल्या नियमित दराच्या २५% मोजणी फी आकारणेत यावी. | |

**टीप** :- त्याच धारकांचे लगत जमिनीचे एक सर्व्हे नंबर / गट नंबर / कायम पोट हिस्सा/नगर भूमापन क्रमांक / फायनल प्लॉट क्रमांक / मंजूर रेखांकनातील एका भूखंडासाठी वरील २(१) व २(२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मोजणी फी आकारणी करावी.

**(३) एकाच अर्जदाराने मोजणी करून मागितलेली जमीन लगत नसल्यास स्वतंत्रपणे मोजणी अर्ज स्विकारून कार्यवाही करावी.**

**(४) पुनर्भेट :-** पुनर्भेट मोजणी फी ही मूळ मोजणी वेळी भरणा केलेल्या ५०% अथवा रक्कम रुपये १०,०००/- यापैकी जी कमी असेल ती आकारण्यात यावी. अर्जदार मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास पुनर्भेट शुल्क आकारण्यात येईल. मात्र, जर भूमापक स्वतः मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिला तर अर्जदारावर पुनर्भेट शुल्क लागू होणार नाही. अशा परिस्थितीत संबंधित अर्जासाठी नवीन मोजणीची तारीख निश्चित करून देण्यात येईल.

**(५) उच्चतपासणी (निमताना मोजणी) :-**

१) अधिनस्त भूकरमापक / परिरक्षण भूमापक यांनी केलेल्या मोजणी कामाची उच्चतपासणी (निमताना मोजणी) उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगरभूमापन अधिकारी यांनी करावयाची असल्यास मूळ मोजणी प्रकरणी प्रत्यक्ष भरलेल्या मोजणी फी च्या तीनपट दराने मोजणी फी आकारणेत यावी.

२) उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगरभूमापन अधिकारी यांनी केलेल्या निमताना मोजणी कामाची तपासणी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख या संवर्गातील अधिकाऱ्याकडून उच्च पातळीवर करण्यात येणाऱ्या निमताना मोजणीसाठी मोजणी फी चे दर मूळ मोजणी प्रकरणी प्रत्यक्ष भरलेल्या मोजणी फी च्या पाचपट दराने आकारणेत यावी.

**(६) गुंठेवारी मोजणी :-** महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) व अधिनियम २००१ मधील कलम ३ (१) अंतर्गत प्राप्त होणाऱ्या मोजणी प्रकरणामध्ये

(अ) महानगरपालिका व नगरपालिका हद्दीबाहेरील भूखंडासाठी परिच्छेद १(१) व १(२) मधील नमूद मोजणी फी चे दिडपट दराने मोजणी फी आकारण्यात यावी.

(ब) महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील मोजणी प्रकरणांसाठी परिच्छेद क्रमांक २(१) व २(२) मध्ये नमुद मोजणी फीचे दिडपट दराने मोजणी फी आकारण्यात यावी.

मोजणी फी ही मोजणी करावयाच्या भूखंडाची आकारण्यात यावी. परंतु मोजणी करतांना मात्र संबंधित सर्व्हे नंबर / गट नंबर मधील संपूर्ण क्षेत्राची मोजणी करण्यात यावी.

**(७) मोजणीचे संवर्ग व कालावधी :-**

मोजणीचा, संवर्ग व कालावधी यामध्ये शेतकरी व जमीन धारकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने त्यामध्ये सुलभीकरण तसेच कालानुक्रमे त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे मोजणीचा संवर्ग व कालावधी निश्चित करण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | मोजणीचा संवर्ग | कालावधी |
|---|---|---|
| १ | नियमित | ९० दिवस |
| २ | द्रुतगती | ३० दिवस |

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२२२१०३४२१६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY
RAGHUNATH
BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.06.22 21:04:18 +05'30'

**(संजय बनकर)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास/गृहनर्माण) यांचे सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव
५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
८) सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
११) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
१६) निवडनस्ती (कार्यासन भूमापन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.